महाराष्ट्र शासन
पणन संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

## जाहिरात

पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे या कार्यालयाच्या स्तरावरुन जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,नागपूर येथे एक सहायक विधी अधिकारी व पणन विभाग, मंत्रालय,मुंबई येथे एक सहायक विधी अधिकारी करार पध्दतीने मानधन तत्वावर नेमणे आहे. त्यासाठी शासकीय सेवानिवृत्त पात्र सहाय्यक विधी अधिकारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी पात्र सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर करावेत. याबाबतची सविस्तर माहिती www.msamb.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र.पणन-०४/आस्था/कंत्राटी नियुक्ती/सहा.विधी अधिकारी/२०२४
दि.२६/०९/२०२४

(स्वाक्षरीत)
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य,पुणे

**महाराष्ट्र शासन**

**पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,**

**तिसरा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, बी.जे.रोड, पुणे-४११ ००१**

शासकीय सेवानिवृत्त सहायक विधी अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर उपलब्धतेसाठी पात्रता निकष

१. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सहायक विधी अधिकारी यांची संख्या – २ (नागपूर व मुंबई येथे प्रत्येकी १)

२. वयोमर्यादा – नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांचे कमाल वय ६५ वर्ष.

३. शैक्षणिक अर्हता – कायदेविषयक / विधी पदवीधर असणे आवश्यक अथवा विधी अधिकारी या पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.

४. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करावयाच्या अधिकारी यांनी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/ १३ दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीची पुर्तता करणे आवश्यक असून सदर तरतूदी त्यांचेवर बंधनकारक असतील. त्यानूसार बंधपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५. मानधन - शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/ १३ दिनांक १७/१२/२०१६ व दि.०८/०९/२०२३ मधील तरतुदीनुसार मानधन देण्यात येईल.

६. शासनाच्या गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) या पदावरुन सेवानिवृत्त अधिकारी असणे आवश्यक.

७. अर्जदार यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा प्रकरणात शिक्षा झालेली नसावी.

८. अर्जदाराचे शारीरिक, मानसिक आरोग्य सक्षम असावे.

पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत करार पध्दतीने विवक्षित कामकाजासाठी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा उपलब्ध करण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. विहीत नमुन्यातील अर्ज सोबत देण्यात आला आहे. इच्छुकांनी ते परिपूर्णरित्या भरुन जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर दि.०४ /१०/२०२४ अखेर पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, तिसरा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, बी.जे. रोड, पुणे-०१, या पत्त्यावर तसेच dirmktms@gmail.com वर पाठवावेत. विवक्षित कामकाजासाठी एमपॅनेलमेंट करून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने प्रथम एक वर्षासाठी घेणेबाबतची कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ व ०८/०९/२०२३ मध्ये नमूद असून तो शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

(स्वाक्षरीत)
**पणन संचालक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

# शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर सहायक विधी अधिकारी या पदांच्या उपलब्धतेसाठी अर्ज

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नांव<br>पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| २. | भ्रमणध्वनी | |
| ३. | ई-मेल | |
| ४. | जन्म दिनांक (सोबत पुरावा) | |
| ५. | दिनांक १/०६/२०२३ रोजीचे वय | |
| ६. | महाराष्ट्र शासनाच्या ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले आहेत त्या विभागाचे नांव व सेवानिवृत्ती दिनांक | |
| ७. | वयाची ६५ वर्षे पूर्ण होत असल्याचा दिनांक | |
| ८. | शैक्षणिक पात्रता व प्रमाणपत्र | |
| ९. | विधी अधिकारी अनुषंगाने केलेल्या कामकाजाचा कालावधी | |
| १० | कामकाजाचा अनुभव व अनुभवाचे प्रमाणपत्र | |

**टिप:-** माहितीचे अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ चे शासन निर्णयातील तरतूदी अनुषंगाने आवश्यक ती कागदपत्रे अर्जासोबत सादर करावीत.

ठिकाण –

दिनांक -- स्वाक्षरी